**<u>रे. मु. नं. ४१४/२०१४</u>**

**अशोक एकनाथ म्हस्के**
**विरुध्द**
**विठ्ठल ममताजी म्हस्के**

## <u>निशाणी क. ३७ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने सदर दावा चालवण्याचा या न्यायालयास अधिकार आहे किंवा नाही याबाबत प्राथमिक मुद्दा काढण्यात यावा यासाठी, तसेच प्रतिवादीने दाखल केलेल्या कैफियतीमध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने सदर दावा प्रतिवादीविरुध्द वादीच्या ताब्यातील व खरेदी मालकीच्याबाबत प्रतिवादी यांनी केलेले खोटे व बेकायदेशीर वाटपपत्र वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच सदर दावा मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारच्या ति-हाईत इसमास बोजा निर्माण करु नये व दावा मिळकतीची विक्री करु नये असा निरंतर ताकीद मनाई हुकूम देण्यासाठी सदरचा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादींनी त्यांची कैफियत दिली आहे. परंतु दरम्यानच्या काळामध्ये दावा मिळकतीचे वाटपाचे संदर्भात ज्या काही घटना घडल्या आहेत, त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे तहसिलदार, पाथर्डी यांचा आदेश वाटप/एस.आर./७६/१४ अन्वये वाटप झाले. तहसिलदार, पाथर्डी यांचे सदर आदेशाविरुध्द वादींनी प्रांत, पाथर्डी यांचेकडे आर. टी.एस.अ.नं. ८५/२०१४ चे दाखल केलेले होते. त्या अपिलाचा निकाल होवून वादी यांचे अपिल प्रांत, पाथर्डी यांनी मंजूर केले. त्या निकालावर नाराज होवून प्रतिवादीने अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे न्यायालयात से.आर.टी.एस.अ.नं. ७१६/२०१५ चे दाखल केले. त्या अपिलाची दुतर्फा चौकशी होवून प्रतिवादीने केलेले अपिल अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मंजूर करुन तहसीलदार, पाथर्डी यांनी कलम ८५ प्रमाणे केलेले वाटप कायदेशीर ठरविलेले आहे. सदर निर्णयाविरुध्द वादी यांनी अप्पर आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांच्या न्यायालयात आर.टी.एस.रि.

नं.४३६/२०१६ चे दाखल केलेले आहे. सदर अपिलाच्या नोटीसा वादी यांना मिळालेल्या आहेत.

३. अशा परिस्थितीमध्ये वादी हे महसुल न्यायालयातील झालेल्या निकालाबाबत महसुल कोर्टात प्रतिवादीबरोबर भांडत आहेत व दुसरीकडे या न्यायालयात सदर दाव्यामध्ये तहसिलदार यांनी केलेले महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वयेचे वाटप वादीवर बंधनकारक नाही अशा प्रकारची मागणी करत आहेत. सदर वाटपाची बाबही पुर्णपणे महसुल न्यायालयाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे या न्यायालयास सदर दावा चालविण्याचा अधिकार आहे किंवा नाही याबाबत सदर दाव्यातील कैफियतीमध्ये दुरुस्ती करणे कायदयाच्या दृष्टीने आवश्यक झालेले आहे व तशी दुरुस्ती करणे कमप्राप्त झालेले आहे.

४. प्रतिवादीने सदर कैफियतीमध्ये कॉ.नं. १३ च्या पुढे - ‘‘१४) सदर दाव्यातील दावा मिळकतीचे संदर्भात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ प्रमाणे वादी, प्रतिवादी यांनी स्वखुशीने वाटप करुन घेतलेले आहे. परंतु सदर वाटपाच्या संदर्भात व दावा मिळकतीचे संदर्भात वादींना संपूर्ण जमिनीची अभिलाषा निर्माण झाली व त्या अनुषंगाने त्याने सदर वाटप त्यांना मान्य नाही म्हणून पाथर्डी येथील उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात आर.टी.एस.अ.नं.७१६/२०१५ चे दाखल केले. सदर अपिलाची गुणदोषावर चौकशी होवून प्रतिवादीने केलेले सदरचे अपिल अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मंजूर केले व तहसीलदार, पाथर्डी यांनी कलम ८५ प्रमाणे केलेले वाटप मंजूर केले. सदरचा निकाल दिनांक ३०.०७.२०१६ रोजी झाला. सदर निकालावर नाराज होवून वादी यांनी पुन्हा अप्पर आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांचे न्यायालयात आर.टी.एस.रि.अ.नं. ४३६/२०१६ चे दाखल केले आहे. त्या अपिलाच्या नोटीसा प्रतिवादींना नुकत्याच मिळालेल्या आहेत.

अशा परिस्थितीमध्ये सदरची महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ ची वाटपासंबंधीची बाब ही महसुल खात्याच्या अधिकारात येते व त्या अनुषंगाने वादीने केलेला सदरचा दावा हा या न्यायालयास चालवण्याचा मुळीच

अधिकार नाही. कारण महसुल न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या संदर्भात वादींना दिवाणी न्यायालयात कायदयाच्या दृष्टीकोनातून दाद मागताच येणार नाही तो अधिकार फक्त महसुल न्यायालयाचा आहे.

तरी त्या संदर्भात या न्यायालयास सदरचा दावा चालविण्याचा अधिकार आहे किंवा नाही ? याबाबत प्राथमिक मुद्दा काढण्यात यावा व त्याची चौकशी होवून सदरचा दावा रद्द करण्यात यावा.'' अशी दुरुस्ती होवून मिळावी असे प्रतिवादीने कथन केले आहे.

५. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर दुरुस्ती ही कायदयाच्या दृष्टीकोनातून अत्यंत आवश्यक आहे व ती दुरुस्ती न झाल्यास कायदयाचीच पायमल्ली होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

६. वादीने प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जावर निशाणी ४२ वर त्यांचे म्हणणे दाखल केले. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीने दिलेला अर्ज योग्य नाही, बरोबर नाही व त्यांना तो मान्य व कबुल नाही. प्रतिवादी यांचा सदर अर्ज मुदतीत नाही म्हणून रद्द व्हावा. प्रतिवादीचा सदरचा अर्ज कायदेशीर नाही मेन्टेनेबल नाही म्हणून रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादी यांचा सदर अर्ज व विनंती वादींना मान्य व कबुल नाही. प्रतिवादींनी मागितलेली दुरुस्ती ही कायदेशीर नाही व या स्टेजला प्रतिवादींना अशी दुरुस्ती मागता येणार नाही. प्रतिवादी ही सर्व परिस्थीती माहीत असताना जाणून बुजून न्यायालयासमोर प्रथमतः मांडत आहे. प्रतिवादीने दिलेली कैफियत निशाणी २४ वर दाखल असून त्या कैफियतीमधे मुद्दाम होवून प्रतिवादीने महसूलकडे तकार चालू असतानाही तसे कथन कैफियतीमध्ये केलेले नाही. त्यामुळे या स्टेजला प्रतिवादींना दुरुस्ती मागता येणार नाही, ती कायदेशीर नाही.

७. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादींना प्रतिवादी व त्यांच्या नातलगांनी कामगार तलाठी, तिसगाव यांनी स्कॉर्पिओ गाडीत पळवून नेवून

सहया घेतलेल्या होत्या. त्याबाबत वादीने अहमदनगर पोलीस स्टेशन व पाथर्डी पोलीस स्टेशन येथे त्याचवेळी तक्रारी दिलेल्या असून पाथर्डी न्यायालयात केस नं. ३३८/२०१४ व ३०७/२०१४ या केसेस दाखल केलेल्या आहेत व त्याचे कामकाज चालू आहे. तसेच वादींनी दैनिक पुण्यनगरी या पेपरमध्येही जाहीर नोटीस दिलेली आहे.

८. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांचे व प्रतिवादी यांचेमध्ये मौजे सावरगाव, ता. आष्टी येथील वडिलोपार्जित मिळकतीचे सन १९८९ सालीचे फेर नं. ६७५ नुसार वाटप झालेले आहे. त्यानुसार ७/१२ सदरी नोंदी झालेल्या आहेत. वादी हे पुणे येथे स्थायीक झाल्यानंतर त्यांनी सुमारे २० वर्षांनी म्हणजे सन २००९ साली सदरच्या दाव्यातील मिळकती म्हणजेच मौजे तिसगाव येथील मिळकती खरेदीने घेतलेल्या असून या मिळकती त्यांच्या वडिलोपार्जित नसून स्वकष्टाच्या आहेत व या मिळकतींशी प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी यांनी कामगार तलाठी, तिसगाव यांना हाताशी धरुन खोटे कागदपत्रे, खोटया सहया, खोटे करारनामे, खोटे बक्षिसपत्र करुन सदरचे वाटपपत्र दाखवलेले आहे. सदरचे वाटपपत्र हे दिनांक २३.०७.२०१४ रोजी दाखवून लगेच दिनांक २५.०७.२०१४ रोजी तहसिलदार यांचा आदेश घेवून प्रतिवादींचे नावे घाईगडबडीत दिनांक ३०.०७.२०१४ रोजी नोंद मंजूर केल्याचे दिसत आहे. याबाबत वादी यांनी केसेस केलेल्या असून पुण्यनगरी या पेपरला दिनांक २९.०८.२०१४ रोजी नोटीस दिलेली आहे. दिनांक ३१.०७.२०१४ रोजी जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांचेकडे उपोषण केलेले आहे. सदर दाखल केलेल्या वाटपपत्रात खोटया सहया केलेल्या दिसत असून अंगठयालाही दस्तुर दिसत नाही. सर्व कागदपत्र खोटे बनवलेले दिसत आहेत. वादींनी दिनांक १४.०७.२०१४ रोजी तहसिलदार यांचेकडे तक्रार देवूनही नोंद न करण्याबाबत सांगूनही चौकशी न करता नोंद मंजूर केलेली आहे.

९. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, तहसिलदार, पाथर्डी यांचा वाटपपत्राचा आदेश दिनांक २३.०७.२०१४ रोजीचा असून प्रांत, पाथर्डी यांचेकडे वादी यांनी लगेच अपिल दाखल केलेले असून त्यात प्रतिवादीने म्हणणे दिल्यानंतर सदर

निकाल गुणदोषावर होवून प्रतिवादीचा खोटया वाटपपत्राचा फेर ७९५१ हा रद्दबातल ठरवलेला आहे. त्यावेळी वादीने न्यायालयात सदरचा दावा दिनांक ०२.०९.२०१४ रोजी दाखल केलेला असून त्यात प्रतिवादी हे दिनांक ०७.१०.२०१४ रोजी हजर होवून त्यांनी त्यांची कैफियत दिनांक ०९.१२.२०१४ रोजी निशाणी २४ वर दिलेली आहे. म्हणजे सदर कैफियत देते वेळी प्रतिवादींना महसूलमध्ये चालू असलेल्या सर्व तक्रारीबाबत माहिती होती. त्यांनी त्याचवेळी कैफियतीमध्ये सदर कथन करणे गरजेचे होते. कैफियत दिल्यानंतर आजपावेतो २५ तारखा झालेल्या आहेत, तो पर्यंत प्रतिवादीने याबाबत कोठेही कथन केलेले नाही. सदर दावा व निशाणी ५ चे कामकाज लांबवण्यासाठी मुद्दामहोवून सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी यांना दिनांक ०७. १०.२०१४ ते ०५.११.२०१६ पर्यंत २ वर्षात संपूर्ण माहिती असतानाही जाणून बुजून दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी कथन केलेले नाही.

१०. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादींनी महसूल विभागाकडे तहसिलदार यांचा दिनांक २३.०७.२०१४ रोजीच्या आदेशावर फेर नं. ७९५१ रद्द होवून मिळणेसाठी अप्पर आयुक्त, नाशिक यांचेकडे अपिल दाखल केलेले आहे. वादी यांची महसूल विभागाकडे फेर नं. ७९५१ हा रद्द होवून मिळणेसाठीचे अपिल आहे. सदर दावा वादीने न्यायालयात झालेले वाटपपत्र वादीवर बंधनकारक नाही असे ठरवून मिळणेसाठी, निरंतर ताकीदसाठी व महसुल विभागाकडील मागणी फेर रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीची दाव्यातील मागणी वेगळी आहे व महसूलकडील मागणी वेगळी आहे. त्यामुळे सदर दाव्यात महसूल विभागाकडील मुद्दा घेण्याचा काहीच प्रश्न येत नाही. महसूल विभागाकडे महसूल अधिनियमानुसार अपिल दाखल केलेले असून या न्यायालयात स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट नुसार दावा दाखल केलेला आहे. या दोन्ही मागण्या भिन्न आहेत. त्यामुळे प्रतिवादी हे जाणून बुजून महसूल व कोर्ट यांची चुकीची सांगड घालून विनाकारण विनाकारण कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन मागत असून दाव्याचे कामकाज लांबवत आहे. सदर न्यायालयातील वादीची मागणी वेगळी असल्यामुळे महसूलकडील बाबी या स्ओजला

प्रतिवादींना घेण्याचा कुठलाही व कोणताही हक्क व अधिकार नाही. पूर्वी दिलेल्या कैफियतमध्ये त्यांनी जाणून बुजून या बाबी घेतलेल्या नाहीत. सदर दाव्याचे कामकाज क्लिष्ट व्हावे, वादीला त्रास व्हावा म्हणून सदरचा अर्ज प्रतिवादींनी विनाकारण दिलेला असून प्रतिवादीने मागीतलेली दुरुस्ती ही कायदेशीर नाही, मुदतीत नाही. प्रतिवादींना या स्टेजला अशा स्वरुपाचा अर्ज दाखल करुन कैफियतमध्ये दुरुस्ती मागता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदर अर्जात मागितलेली दुरुस्ती योग्य व बेकायदेशीर अशी असल्याने प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र असून तो रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

११. मी दावा, अर्ज व अर्जावरील म्हणण्याचे तसेच दाव्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींचे वकील श्री. एल. आय. शेख व प्रतिवादीचे वकिल श्री. व्ही. डी. वेलदे यांचा युक्तीवाद ऐकला.

१२. वादीने मूळ दावा प्रतिवादीविरुध्द तहसिलदार, पाथर्डी यांच्या आदेशाप्रमाणे त्यांच्यात झालेल्या वाटपाचा आदेश बेकायदेशीर असून तो वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने सदर अर्जाद्वारे तहसिलदार, पाथर्डी यांच्या आदेशाविरुध्द झालेल्या अपिलाबाबत व विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे अपिल प्रलंबित असल्याबाबत कथन केले असून त्यामुळे प्रतिवादीने दाखल केलेल्या कैफियतीमध्ये सदर अपिलांबाबत त्यांना दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे कथन आहे. प्रतिवादीने कैफियतीमध्ये तहसिलदार, पाथर्डी यांच्या आदेशाविरुध्द अपिल चालू असल्याचे कथन केले आहे. परंतु, दरम्यानच्या काळात अपिल हे प्रांत अधिकारी यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे व जिल्हाधिकारी यांचेकडून विभागीय आयुक्त यांचेकडे वादी व प्रतिवादींनी केल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट दिसते. प्रतिवादींना सदर दाव्यातील दावा मिळकतीबाबत महसूल अधिका-यांकडे अपिल चालू असल्यामुळे सदर दावा न्यायालयास चालविण्याचा अधिकार नसल्याबाबत कैफियतीमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे या अर्जाद्वारे कथन केले आहे. वादीने सदर अर्जात दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले असता

असे दिसून येते की, वादीचा सदर दावा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी असल्यामुळे प्रतिवादीस आवश्यक असलेल्या दुरुस्तीची दाव्यात गरज नाही. प्रतिवादीने मागणी केलेल्या दुरुस्तीचा विचार केला असता प्रतिवादीस दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घडामोडींचा उल्लेख दाव्याच्या कैफियतीमध्ये घ्यावयाचा आहे असे दिसते. त्याबाबत प्रतिवादीने स्वतः महसुल अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अपिलांबाबत कागदपत्रे न्यायालयासमोर निशाणी ४० च्या वर्णनयादीसोबत दाखल केलेली आहेत. सदरच्या दुरुस्तीने दाव्याच्या स्वरुपात कसलाही बदल दिसत नाही. याउलट, दाव्याच्या मागणीचा विचार करता, सदरची कैफियतीमधील दुरुस्ती दाव्याच्या अंतिम निकालासाठी प्रथमदर्शनी आवश्यक असल्याचे दिसते.

१३. दाव्यातील मूळ मागणीचे अवलोकन केले असता प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे प्रथमदर्शनी न्यायोचित दिसते. तसेच सदर अर्ज मंजूर केल्यास वादींचे कसलेही नुकसान दिसत नाही. तसेच सदर दुरुस्तीने मूळ कैफियतीमध्ये कसलाही बदल होत नाही. सबब, प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने सूचक असून त्यासाठी मी खालील आदेश पारीत करतो :-

**आ दे श**

**१)** प्रतिवादीचा निशाणी ३७ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२)** प्रतिवादीने प्रस्तुत दाव्यातील दुरुस्ती या आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी.

**३)** प्रतिवादीने दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

दिनांक : २०/१२/२०१६

**(डॉ. डी. जी. पटवे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पाथर्डी